## Journal Details

| | |
|---|---|
| **Journal Title (in English Language)** | Sanshodhak (print only) \| (Current Table of Content) |
| **Journal Title (in Regional Language)** | संशोधक (print only) |
| **Publication Language** | English , Marathi |
| **Publisher** | Itihasacharya V. K. Rajwade Sanshodhan Mandal |
| **ISSN** | 2394-5990 |
| **E-ISSN** | NA |
| **Discipline** | Arts and Humanities |
| **Subject** | Arts and Humanities (all) |
| **Focus Subject** | History , Literature and Literary Theory |
| **UGC-CARE coverage year** | from April-2021 to Present |

Arts, Science & Commerce, College ★ Mokhada ★




**Copyright © 2022 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer**

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : १० मार्च २०२२ पुरवणी विशेषांक





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

50

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ४

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक :**

✻ प्रकाशक ✻

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No. 2394-5990


१९ **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानव मुक्तीचे लढे** – डॉ.विजय रेवजे, सोलापूर ------------ ८३

२० **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवादी दृष्टीकोण**
– डॉ.वासुदेव डोंगरदिवे, विक्रमगड, जि. पालघर --------------------------- ८५

२१ **महात्मा फुले यांचे पददलितांच्या शिक्षणासंबंधीचे योगदान** – प्रा.आनंद शिंदे, सोलापूर ------- ९०

२२ **महात्मा जोतीराव फुले – एक दृष्टा और स्त्रष्टा युगपुरुष** – डॉ.दत्तात्रय अनारसे, माढा, जि.सोलापूर - ९३

२३ **डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बहिष्कृत हितकारिणी सभा**
– डॉ.दिगंबर वाघमारे, टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर ------------------------- ९६

२४ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सशक्तिकरण**
– डॉ.दिलीप बिराजदार, माकणी, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद------------------- १०१

२५ **महात्मा जोतीराव फुले यांच्या कुळंबीण' अखंडातील जातीव्यवस्था व स्त्री शोषणाचा विचार**
– डॉ.दिनकर मुरकुटे, हडपसर, पुणे -------------------------------- १०५

२६ **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक व कृषिविषयक विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास**
– डॉ.स्मीता पाकधाने, नाशिक ------------------------------------ १०९

२७ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर : बौद्ध धम्म प्रभाव आणि वारसा, सामजिक अस्तित्वाचा पर्यायी समृद्ध मार्ग**
– डॉ.प्रभाकर कोळेकर, सोलापूर------------------------------------ ११६

२८ **आंबेडकरवादी इतिहास पद्धतीचे वैचारिक तत्त्वज्ञान व त्याची मिमांसा**
– डॉ.प्रविण बोरकर, उल्हासनगर ---------------------------------- १२३

२९ **आधुनिक भारताच्या सामाजिक चळवळीचा दीपस्तंभ महात्मा फुले कृत सत्यशोधक समाज**
– डॉ.राजेंद्र गायकवाड, टेंभुर्णी, . ---------------------------------- १२९

३० **महात्मा जोतिराव फुले यांचे सत्यशोधक समाजाबाबतचे विचार**
– डॉ. सुशिल शिंदे, पंढरपूर ------------------------------------- १३१

३१ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलित चळवळीतील योगदान**
– डॉ.संजीव बोधे, खटाव, जि.सातारा -------------------------------- १३६

३२ **महात्मा ज्योतीराव फुले यांचे सामाज सुधारणाविषयक विचार**
– प्रा.दत्तू शेंडे, कर्जत, जि.अहमदनगर. ------------------------------- १३९

३३ **आधुनिक भारताच्या संविधान निर्मितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान**
– डॉ.सुभाष वाघमारे, सातारा. ------------------------------------- १४१

३४ **डॉ. बाबासाहब अंबेडकर के वैचारिक परिप्रेक्ष्य में हिंदी दलित आत्मकथा साहित्य**
– डॉ.प्रमोद परदेशी, कर्जत, जि.अहमदनगर. ----------------------------- १४५

३५ **समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक महात्मा फुले यांचे विचार व कार्य : एक अभ्यास**
– डॉ.गौतम ढाले, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर. ---------------------------- १४९

३६ **महात्मा फुले यांचे शेतकऱ्यांच्या प्रगतीबाबत विचार** – डॉ.घनश्याम महाडीक, अमरावती ---- १५४

३७ **महात्मा फुले यांचे भारतीय शेती व शेतकऱ्याविषयीचे विचार**
– १) डॉ.उद्धव घोडके, पुणे; २) डॉ.पांडुरंग लोहोटे, पुणे. ------------------- १५६

३८ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय समाजाच्या शिक्षणाचा हक्क**
– डॉ.संतोष जाधव, मोखाडा, जि.पालघर. ------------------------------ १५९




59

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय समाजाच्या शिक्षणाचा हक्क

डॉ. संतोष हनुमंत जाधव
कला, विज्ञान व वाणिज्य, महाविद्यालय, मोखाडा, जि. पालघर-४०१६०४.
मोबईल-९८५०५५८५७६. ईमेल - san.jadhav@gmail.com

Arts Science & Commerce College Mokhada

**प्रस्तावना :**

शिक्षणाचा हक्क हा मानवी जीवनातील महत्वपूर्ण भाग आहे. 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा.' असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समाज बांधवांना सदेश दिला. हा सदेश बहुजन समाजाच्या दृष्टीने खूप मौल्यवान होता. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन करता येणार होते. समाजातील अस्पृश्यच नव्हे तर सर्वच मागासवर्गीय लोकांना विशेष शिक्षण मिळत नव्हते. स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नव्हताच उलट तिला अनेक बंधनात जखडून ठेवले होते. अशी भारतीय समाजाची शिक्षणाविषयी दुरवस्था झालेली होती. ती केवळ शिक्षणाचा हक्क नाकारला गेला म्हणून समाज अज्ञानाच्या अंधारात चाचपडत होता. शिक्षणाच्या अभावामुळे मानव गुलामगिरीत अडकत होता. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो व्यक्ती ते प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. शिक्षणाचा मानवाला आत्मस्वातंत्र्य व आत्मरक्षणासाठी वापर करता येईल. त्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केले. भारतीय बहिष्कृत समाज सेवा समिती, पीपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थांच्या माध्यमातून कार्य केले. भारताच्या संविधानाची निर्मिती चालू झाल्यापासून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व स्त्री शिक्षणाच्या हक्कासाठी डॉ.आंबेडकरांनी मांडणी करून त्यासाठी संविधानात तरतुदी केल्या आहेत. सदर शोधनिबंधात भारतीय शिक्षण व्यवस्था प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळाची मांडणी केली आहे. तसेच डॉ. आंबेडकरांच्या स्वातंत्र्यापुर्वी व स्वातंत्र्यानंतर केलेल्या कार्याची माहिती दिली आहे.

**भारतातील शैक्षणिक स्थिती -**

मानव हा समाजशील प्राणी आहे. प्राचीन कालखंडात तो नैसर्गिक जीवन जगत होता. नैसर्गिक अनुभवातून मानवाची प्रशिक्षणाची प्रक्रिया पूर्ण होत होती. मानवाची भटकंती थांबल्यानंतर तो स्थिर जीवन जगू लागला. अग्नी व चाकाच्या शोधांमुळे मानवी जीवनाला गती प्राप्त झाली खरी परंतु त्याच वेळी माणूस सामाजिक नियम व बंधन पाळून जीवन जगू लागला. ही त्या काळातील सर्व विश्वाची स्थिती होते. भारतही त्याला अपवाद नव्हता. भारतीय समाजाची चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशी विभागणी झाली. अशा वर्णव्यवस्थेची विभागणी म्हणजे कामाची वाटणी अर्थातच कर्मव्यवस्था होय. कर्मव्यवस्थेमधूनच जातीव्यवस्थेचा जन्म झाला.

मध्ययुगात अठरापगड जातींची म्हणजेच बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार यांच्यात जातीव्यवस्थेची पाळंमुळं घट्ट झाली, परिणामी सामाजिक भेद निर्माण होत गेला. हा भेदभाव दूर करण्याचे कार्य मध्ययुगातील संत चळवळीने केले. त्यामध्ये संत ज्ञानेश्वर, संत चोखोबा, संत तुकाराम इत्यादी संतांनी सामाजिक प्रबोधन करून समतेचा व विश्वबंधुत्वाचा मार्ग दाखविला, तरीही सनातन वर्गाला हे प्रबोधन विशेष रुचले नाही. नंतरच्या काळात अस्पृश्य, स्त्रियांवरील बंधने, शेतकरी, कामगार यांच्या वाट्याला हालअपेष्टा येऊ लागल्या.

आधुनिक काळात हिंदुस्थानावर ब्रिटिशांचे साम्राज्य होतं. ब्रिटीश भारतीयांचं श्रम व संपत्तीचे शोषण करत होते. हिंदुस्थानातील साम्राज्य विस्तार वाढत गेला. हा वाढता पसारा सांभाळण्यासाठी ब्रिटिशांना कामगारांची गरज भासू लागली. त्यावेळी प्रथम त्यांनी भारतीयांच्या शिक्षणासाठी १८१३ च्या सनदी कायद्यात एक लाख रुपयांची तरतूद केली. त्या अगोदर भारतात पंतोजीच्या शाळा होत्या. त्या शाळांमधून ब्राह्मण विद्यार्थी व क्षत्रिय आणि वैश्य वर्णातील मोजक्या लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध होत होती. शूद्र वर्णातील लोकांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला होता. अनुसूचित जमाती व कनिष्ठ जातींची स्थिती काही वेगळी नव्हती. १८३३ च्या सनदी कायद्यात सुधारणा करून १८३५ साली लॉर्ड मेकॉले यांनी पाझर सिद्धान्त मांडला. भारतीयांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याची व्यवस्था केली गेली. इ.स. १८५४ साली चार्लस वुड यांनी शिक्षण विषयक सुधारणेसाठी जो अहवाल सादर केला. त्यानुसार भारतात आधुनिक कालखंडातील विद्यापीठीय शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्या आधारावरच १८५७ साली मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे विद्यापीठांची स्थापना झाली. इ.स. १८८२ साली हंटर कमिशन, १९०४ चा लॉर्ड कर्झनचा विद्यापीठ कायदा तर १९१७ चे सॅडलर कमिशन असे

ISSN No. 2394-5990

ब्रिटिशांनी भारतीयांच्या शिक्षणासाठी सरकारी पातळीवर अनेक प्रयत्न केले.

त्या काळात भारतात राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा ज्योतिराव फुले, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी समाजसुधारकांनी शैक्षणिक सुधारणेसाठी प्रयत्न केले. ज्यामुळे अज्ञान व अंधश्रद्धेत गुरफटलेल्या समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून नवी दिशा मिळाली. त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, कनिष्ठ जाती, स्त्री शिक्षणासाठी कार्य केले. ह्या सर्वांना हक्काचं शिक्षण मिळावे म्हणून शैक्षणिक संस्था काढल्या व संविधानात कायदेशीर तरतुदी केल्या.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्राथमिक शिक्षण घेत असताना शाळेत पाळल्या जाणार्या अस्पृश्यतेची जाणीव झाली होती. स्पृश्य हिंदूचे अस्पृश्य लोकांशी वागणे माणुसकीशून्य होते. यातून जे चटके बसले त्यावरील उपाय योजना म्हणजे अस्पृश्य समाजाच्या शिक्षणाची सोय करायला हवी असे डॉ. बाबासाहेबांना वाटू लागले त्यापूर्वीच महाराष्ट्रात अस्पृश्योद्धाराच्या कार्याचा प्रारंभ शिवराम जानबा कांबळे यांनी केला होता. त्यांनीच भारतातील पहिली अस्पृश्यांची परिषद बोलावली होती. अस्पृश्यांना ज्ञानदान केल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नव्हती. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या माध्यमातून संघटित स्वरूपात पहिलाच प्रयत्न केला. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या 'सर्व्हंटस ऑफ इंडिया' या संस्थेने सुद्धा अस्पृश्यता निवारणासाठी कार्य केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मॅट्रिक नंतरच्या शिक्षणाचा खर्च वडिलांना पेलवणारा नव्हता तेव्हा बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी डॉ.बाबासाहेबांच्या बुद्धिमत्तेला आणखी संधी मिळावी म्हणून त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलला होता. कालपर्यंत शाळा व महाविद्यालयात अनुभवास आलेली अस्पृश्यता डॉ.आंबेडकरांनी आपल्या अभ्यासाच्या जोरावर समाजशास्त्र, अर्थशास्त्र, कृषी, विधी, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र अशा अनेक विषयांमध्ये अभ्यास करून सखोल ज्ञान मिळविले. भारतीय समाजातील अस्पृश्यता दूर करण्याचे महत्त्वाचे व प्रभावी साधन म्हणजे शिक्षण होय असे बाबासाहेबांच्या लक्षात आले. सामाजिक परिवर्तनासाठी बहुजन व अस्पृश्य समाजासाठी शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न सुरू केले.

**भारतीय बहिष्कृत समाज सेवा समिती –**

डॉ.आंबेडकरांनी १४ जून १९२८ रोजी ह्या संस्थेची स्थापना केली. सरकारने या संस्थेच्या पाच छात्रालयांना अनुदान देण्याची तरतूद केली. संस्थेचे प्रमुख कार्यवाह सीतारामपंत शिवतरकर होते, तर अध्यक्ष स्वतः बाबासाहेब आंबेडकर होते. भारतीय बहिष्कृत सेवा समितीने शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक सुधारणांवर सुद्धा भर दिला.

**पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना –**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य समाजातील व कनिष्ठ जातीतील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून दि.८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक सोसायटीची स्थापना केली. विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे म्हणून आणि तेच विद्यार्थी समाजाच्या उद्धारासाठी प्रयत्न करतील हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून महाविद्यालयीन शिक्षणाची सोय केली. दि.२० जून १९४६ रोजी मुंबई याठिकाणी सिद्धार्थ महाविद्यालय आणि औरंगाबाद येथे दि.१९ जून १९५० रोजी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयातून हजारोच्या संख्येने तरुण शिक्षण घेऊन सामाजिक चळवळीत काम करू लागले.

**स्त्री शिक्षण –**

भारतीय समाजात स्त्रीला दुय्यम स्थान दिले जात होते. त्याला कोणताही धर्म अपवाद नव्हता. स्त्री अशा व्यवस्थेची बळी ठरत होती. महिलांना शिक्षण मिळाले तर महिलेचे कल्याण होईल व तिला स्वातंत्र्य मिळेल. परिणामी समाज विकासास चालना मिळेल हा दूरदृष्टीकोन ठेवून संसदेत 'हिंदू कोड बिल' मांडले. स्त्रियांच्या शिक्षणासाठी संविधानिक तरतूद केली. त्यामुळे स्त्री आज पुरुषाच्या बरोबरीने अनेक क्षेत्रात पुढे आलेली दिसते. याचे श्रेय डॉ.आंबेडकरांना द्यावे लागते.

**भारतीय संविधानात डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाच्या हक्कासाठी केलेल्या तरतुदी –**

भारताला स्वातंत्र्य मिळण्याअगोदर दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर सत्ता हस्तांतरित करण्यासाठी ब्रिटिशांचे त्रिसदस्यीय शिष्टमंडळ 'कॅबिनेट मिशन' भारतात आले. या शिष्टमंडळाने दि.१६ मार्च १९४६ रोजी सत्ता हस्तांतरणाची घोषणा केली. शिष्टमंडळाने भारताचा भावी राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टीने संविधान असावे व त्याच्या निर्मितीसाठी एक सभा स्थापन करण्याचे सुचित केले. त्यानुसार संविधान अध्यक्षपदी डॉ.राजेंद्र प्रसाद यांची नियुक्ती करण्यात आली तर मसुदा समितीच्या अध्यक्षपदी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली.

डॉ.आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेतील एकही बालक शिक्षणापासून वंचित राहवू नये असे वाटत होते. कारण त्यामुळे समाजाची अपरिमित हानी होते. अशी हानी होवू नये म्हणून मानवासाठी आवश्यक मूलभूत हक्कांचे विवेचन राज्यघटनेच्या भाग ३ मध्ये केले आहे. त्यात अंतर्भूत होणाऱ्या स्वातंत्र्याच्या हक्कांमध्ये अनुच्छेद २१ नुसार राज्य हे सहा वर्षापासून ते चौदा वर्षांपर्यंतच्या मुलांना कायद्याने ठरविल्यानुसार शिक्षण देईल.

राज्यघटनेच्या भाग ४ मधील राज्य धोरणांची निदेशक तत्त्वांमध्ये ४५ व्या निदेशक तत्त्वात राज्य हे बालकांचे वय सहा वर्षाचे होईपर्यंत त्यांचे संगोपन करण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी तरतूद करेल. कारण भारतात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व काही कनिष्ठ जातीतील लोकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. ह्या समाजातील घटकांना उदरनिर्वाह चालविणे अवघड होते. आपल्या बालकांच्या शिक्षणाचा विचार खूप दूरचा होता. त्यांच्या संगोपनाची व शिक्षणाची जबाबदारी राज्याने घेण्याची तरतूद केली होती.

**मागासवर्गीयांसाठी शिक्षण –**

संविधानाच्या कलम १७ नुसार समाजात कोणीही अस्पृश्यता पाळणार नाही अथवा भेदभाव करणार नाही. तसे केल्यास तो कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध आहे. कलम १५ नुसार : राज्य कोणत्याही नागरिकांना प्रतिकूल होईल, अशाप्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान अशा कारणांवरून भेदभाव करणार नाही. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी विशेष तरतूद केली जाईल. ४६ व्या निदेशक तत्त्वानुसार राज्य जनतेतील दुर्बल घटक आणि विशिष्ट हा अनुसूचित जाती अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे रक्षण करेल. केवळ त्यामुळेच मागासवर्गातील जाती जमातींची उन्नती होणार नाही हे डॉ. आंबेडकरांनी जाणले होते.

**शिक्षणातून नोकरीची संधी –**

मागासवर्गातील तरुणाने शिक्षण घेतल्यानंतर सरकारी पदभरती होताना सामाजिक न्यायानुसार त्यांना निकारीची संधी मिळायला हवी हा विचारसुद्धा डॉ.आंबेडकरांनी केला होता. भारतीय संविधान कलम १६ अंतर्गत १६(१) राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजना अथवा नियुक्ती करताना यासंबंधी सर्वांना समान संधी असेल. १६(४)नुसार राज्यांच्या सेवांमध्ये पर्याप्त प्रतिनिधित्व नाही, अशा मागासवर्गीयांसाठी नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यास कोणतीही तरतूद करण्यात राज्यास प्रतिबंध नसेल. डॉ.बाबासाहेब शिक्षणासंबंधी, शिक्षण व्यक्तीच्या शरीरात भिनले पाहिजे. त्यामुळे त्याचे मन व शरीर सुदृढ राहील. शिक्षणाअभावी व्यक्ती पशुवत होईल म्हणून व्यक्तीला शिक्षणाची गरज आयुष्यभर राहते. असे मत मांडतात. स्वतः बाबासाहेबांनी अतिउच्च शिक्षण घेऊन संपूर्ण जगासमोर आदर्श निर्माण केला.

**मूल्यमापन –**

शिक्षण हे मानवी समाजाच्या सर्वांगीण विकासाचे साधन आहे. शिक्षण हे अज्ञानी व अडाणी समाजाला शहाणपण देणार प्रभावी माध्यम आहे. व्यक्तीला अन्यायविरुद्ध उठाव करण्याच सामर्थ्य केवळ शिक्षणामुळेच प्राप्त होते. शिक्षणामुळे वैचारिक, मानसिक क्षमता वाढतात. एकंदरीत व्यक्तिमत्व विकास होतो. शिक्षण हे समाजात परिवर्तन करण्याचे पराभवी साधन आहे. कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील सर्वंकष जनतेचा विकास झाल्याशिवाय होत नसते. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला समाज आणि स्त्रिया यांना शिक्षण दिले तरच संबंधित देश प्रगतीपथावर जाऊ शकेल. शिक्षण हे समाजात स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव करू शकते. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने संपूर्ण जगाला शैक्षणिक सुधारणेच्या सहाय्याने सामाजिक क्रांतीचा आदर्श घालून दिला.

**संदर्भसूची –**

१) धनंजय कीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती, दुसरे पुनर्मुद्रण,२००२.
२) भारताचे संविधान, मिलिंद प्रकाशन, वर्धा, २०१०.
३) https://www.mahamtb.com/Encyc/2020/12/6/dr-babasaheb-s-contribution-to-education-.html, दिनांक 06-Dec-2020 17:06:48 Visit Date: 29/03/2022. Time:4.00.
४)https://www.mahamtb.com/Encyc/2020/12/6/dr-babasaheb-s-contribution-to-education-.html, Visit Date: 29/03/2022. Time:4.00.
५) प्रवीण घोडेस्वार (संपा.), डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन प्रश्न, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक,२०१६.